33

26

विनाअनुदान तत्वावर औषध निर्माणशास्त्र
पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास मंजूरी.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक- पीटीआय-२०९४/(२९७०)/तांशि-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०००३२

दिनांक:- १ जुलै १९९४

पहा:- १] अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र
क्र. एफ-७०७-४०/एमएस/(८) आरसी/९४,
दिनांक ११ जून, १९९४

२] अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र
क्र. एफ-२७/७५/आरसी/एमएच/९२,
दिनांक १७ जून, १९९४

"""""

शासन निर्णय:- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या वर उल्लेखिलेल्या दोन पत्रांव्दारे खालील दोन संस्थाना विनाअनुदान तत्वावर औषध निर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास पूर्व मान्यता दिलेली आहे. :-

| अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने १९९४-९५ साठी मान्यता दिलेल्या संस्था | पदविका अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १] नवजीवनी शिक्षण मंडळ, दारव्हा, जि., यवतमाळ | औषध निर्माणशास्त्र | ४० |
| २] पी. एस. आर. प्रियदर्शिनी तंत्रनिकेतन, अकोला | औषध निर्माणशास्त्र | ३० |

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेली वरील पूर्व मान्यता लक्षात घेऊन राज्य शासनाकडून या शासन निर्णयाव्दारे वर मान्यता देण्यात आलेल्या संस्थांना औषध निर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम मंजूर प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास परवानगी देत आहे. सदर परवानगी खालील अटी व शर्तींवर देण्यात

Principal
College of Pharmacy
Darwha, Dist. Yavatmal

Principal
College of Pharmacy
Darwha Dist Yavatmal

आदेश :-

१] अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या मान्यता पत्रात विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील,

२] विनाअनुदान तंत्रशिक्षण संस्था, तसेच औषध निर्माणशास्त्र पदविका संस्थांच्याबाबतीत शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती वरील संस्थांना बंधनकारक असतील,

३] शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थांकडून करारनामा करण्यात येऊन* घेईल व तो तंत्रशिक्षण संचालकांना सादर करावा लागेल,

४] वरील अ.क्र. १ ते ३ मध्ये अंतर्भूत असणाऱ्या कागदपत्रांची व औपचारिक बाबींची पूर्तता सदर संस्थांकडून तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल,

५] सदर पदविका अभ्यासक्रमासाठी तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य यांची संलग्नता घ्यावी लागेल,

६] औषध निर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्याबाबतीत वेळोवेळी राज्य शासनाकडून करण्यात आलेल्या/ येणाऱ्या नियमांचे, प्रवेश नियमांचे, शिक्षण शुल्क व इतर शुल्क यासंबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थांना बंधनकारक असेल,

३. प्रकरणाधीन बाबतीत आवश्यकत्या औपचारिक बाबी सदर संस्थांनी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी संपर्क साधून पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाकडून संलग्नीकरणास परवानगी घेतल्यानंतर तंत्रशिक्षण संचालकांची अंतिम मान्यता घेऊन सदर संस्थांनी प्रवेशाची कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

४. सदर संस्थांना दिलेली मान्यता x लक्षांत घेऊन संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य यांनी आवश्यकती कार्यवाही करावी व सदर संस्थाचा व त्यामधील अभ्यासक्रमांचा तपशिल लक्षांत घेऊन औषध निर्माणशास्त्र पदविका संस्थांची नोंदवही अद्यावत करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ सु. जो. लेलेकर ]

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१

Principal
College of Pharmacy
Darwha Dist Yavatmal

Principal
College of Pharmacy
Darwha Dist Yavatmal

उपसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, [illegible] अमरावती

सचिव, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, शासकीय तंत्रनिकेतन
इमारत, वांद्रे [पुर्व] मुंबई-५१

अध्यक्ष, नवसंजीवन शिक्षण मंडळ, दारव्हा, जि. यवतमाळ.

अध्यक्ष, पी. एस. आर. प्रियदर्शनी तंत्रनिकेतन, अकोला.

अतिरिक्त सचिव, [तांत्रिक] भारत शासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,
इंदिरा गांधी-स्पोर्टस कॉम्प्लेक्स, इंद्रप्रस्थ इस्टेट,
नवी दिल्ली-११०००२

सहाय्यक शिक्षण सल्लागार [तांत्रिक] भारत शासन, मनुष्यबळ विकास
मंत्रालय, शिक्षण विभाग, पश्चिम विभागीय कार्यालय,
इंडस्ट्रियल अश्युरन्स बिल्डींग, चर्चगेट, मुंबई-२०

निवड नस्ती, तांशि-२

Principal
Navsanjivan Shikshan Mandal
College of Pharmacy
Darwha Dist Yavatmal

Principal
College of Pharmacy
Darwha Dist Yavatmal

Principal
College of Pharmacy
Darwha Dist Yavatmal

Principal
College of Pharmacy
Darwha Dist Yavatmal